# वेळास

## कासव संवर्धनातून पर्यटनाला चालना देणारं गाव




डॉ. गुरुदास नूलकर
विश्वस्त
इकॉलॉजिकल सोसायटी, पुणे


'वेळास ग्रामस्थांना कासव पर्यटनाचा फायदा तर झालाच; शिवाय मुख्य म्हणजे कासव संवर्धनाला एक शाश्वत मॉडेल मिळालं... खऱ्या अर्थानं इको टुरिझम करणाऱ्या वेळासचं मॉडेल कोकणातल्या अनेक गावांमधून राबवणं शक्य आहे. यात आर्थिक फायदा तर आहेच, त्याचबरोबर पर्यावरणीय ऱ्हास थांबवण्याची आणि गावाचं स्वास्थ्य जपण्याची क्षमताही आहे...'



आजच्या धकाधकीच्या जीवनात एखादा 'लाँग वीकएंड' आला की शहरवासीयांना चार क्षण निसर्गात घालवण्याची संधी मिळते. शहरातला मराठी माणूस विशेषतः कोकणाकडं धाव घेणं पसंत करतो. लोभस समुद्रकिनारा, समृद्ध निसर्ग, उत्तम जेवणखाण आणि कमी अंतर अशा सगळ्याच गोष्टी जमून आल्यानं कोकणातलं पर्यटन झपाट्यानं वाढलं आहे. मग 'लाँग वीकएंड'ला कोकणातली अगदी छोटी गावंसुद्धा गजबजून जातात. किनारपट्टीवर खाण्या–पिण्याचे स्टॉल्स आणि 'बीच गेम्स'ची गर्दी होते, तर गावात वाहतुकीची कोंडी. पर्यटकांच्या स्वागताला घरोघरी न्याहारी–निवास चालू झाले, अनेक वाड्यांमधून 'रिसॉर्ट' बांधले गेले. जसं पर्यटनातून उत्पन्न वाढलं, तशी गावाची अर्थव्यवस्था बदलत गेली. गावात गाड्या आल्या, बाजारात घरगुती खाद्यपदार्थ कमी झाले आणि शहरवासीयांच्या पसंतीचे पाकीटबंद पदार्थ, शीतपेयं आणि पाण्याच्या बाटल्या आल्या. कोकणात शहरी जीवनशैली पोहोचली आणि त्याबरोबर कचरा आणि सांडपाणी वाढलं. गावांच्या व्यवस्थापनात काहीच सुधारणा झाली नाही आणि अनियंत्रित पर्यटनामुळं कोकणातल्या अनेक गावांची रया गेली. अलिबाग, किहीम, हरिहरेश्वर, दिवेआगर, हर्णे, दापोली अशा सगळ्या गावांतून आज (अनियंत्रित) पर्यटनाचा ठसा दिसून येतो; पण यातून एका गावानं मात्र आपलं अस्तित्व जपलं. इतकंच नाही तर 'संयमित पर्यटना'तून आपल्या गावाचा एक नैसर्गिक खजिना त्यांनी जोपासला. ते गाव आहे 'वेळास' आणि त्याची खासियत आहे ती इथं येणारी 'ऑलिव्ह रिडली कासवं'.

आजकाल 'इको टुरिझम' या संकल्पनेचा अतिवापर झाला आहे. 'इको टुरिझम'ला काही ठोस व्याख्या नसल्यानं याचा कुणीही कसाही वापर करताना दिसतो. त्यामुळं खरोखर पर्यावरणपूरक काम करणारे थोडेफार लोक असले, तरी पर्यटकांची दिशाभूल करणारेही खूप आहेत. निसर्गप्रधान पर्यटन किंवा गावाच्या सांस्कृतिक परंपरेचा उद्धार होईल अशा पर्यटनाला 'इको टुरिझम' म्हणता येईल. वेळास गावानं खऱ्या अर्थानं 'इको टुरिझम'चा पाठपुरावा केला. जेमतेम बाराशे लोकसंख्या असलेल्या वेळासमधून समुद्राकडं थेट प्रवेश नसल्यानं पर्यटकांची तितकीशी पसंती नव्हती, किंबहुना हे गाव तसं माहीतही नव्हतं; पण कासव संवर्धनाचा उपक्रम हाती घेऊन या गावानं कासवांचं यशस्वी संवर्धन तर केलंच, शिवाय पर्यटनातून गावाचा फायदाही करून घेतला.

मुंबईच्या दक्षिणेला सुमारे २२५ कि. मी. अंतरावर आणि पुण्याच्या पश्चिमेला २०० कि. मी. अंतरावर असलेल्या वेळास गावाला एक सुरक्षित किनारा लाभला आहे. गाव आणि किनारा यांमध्ये एक छोटी खाडी आहे. किनारपट्टीवर घरं किंवा वाड्या नाहीत की रहदारी नाही. तिथं वाहनं घेऊन जाणंही मुश्कील आहे. समुद्रकिनारा उथळ आहे आणि वाळू संपताच केवड्याची जाळी आहे. मानवी वर्दळ कमी असल्यानं ही किनारपट्टी प्राणी–पक्ष्यांसाठी सुरक्षित आहे, त्यामुळं फार पूर्वीपासून इथं 'ऑलिव्ह रिडली' कासवं येऊन आपली अंडी घालून जात आहेत; परंतु गेल्या दशकात या किनाऱ्यावर माणसांची वर्दळ वाढली. त्यांच्याबरोबर कुत्री आली. केवड्याची वनं जाऊन



सुरूची लागवड झाली आणि तिथं कोल्हे यायला लागले. या सर्व बदलांमुळं कासवांच्या अंड्यांची मानवाकडून आणि इतर प्राण्यांकडून शिकार वाढली. किनारपट्टी जशी कासवांच्या अंड्यांना असुरक्षित होत गेली, तसं कासवांचं तिथं येणं कमी झालं.

साधारण हिवाळ्याच्या सुरुवातीला कासवं वेळासला यायला लागतात. त्यांचं आगमन रात्रीच्या अंधारात होतं. पाण्यातून बाहेर येऊन संथ गतीनं किनाऱ्याच्या कोरड्या भागात पोहोचून ते पायांनी खड्डा करतात. त्यात सुमारे शंभर अंडी घालून, खड्डा बुजवून परत समुद्रात निघून जातात. कासवाचे ठसे वाळूत उठल्यानं त्यानी घरटं कुठे केलं आहे हे कळतं. 'सह्याद्री निसर्ग मित्र संस्थे'मार्फत या ठिकाणाचा अभ्यास करून, या ठिकाणी कासवांचं येणं कमी होत असल्याची दखल घेतली गेली आणि २००२मध्ये या कासवांच्या संवर्धनाचा कार्यक्रम हाती घेतला. प्रथम वेळासच्या ग्रामस्थांमध्ये त्याविषयीची जागृती वाढवण्याचं काम या संस्थेनं चालू केलं. कासवांचं महत्त्व पटून त्यांचं संवर्धन करायला गावकरी तयार होण्यात काही काळ गेला; पण अखेर सर्व गाव एकत्र आलं. वन विभागाच्या आणि ग्राम पंचायतीच्या मदतीनं गावानं कासव संवर्धनाचं काम चालू केलं. पैदास काळात ग्रामस्थ किनारपट्टीवर आळीपाळीनं गस्त घालायला लागले. त्यामुळं अंड्यांची चोरी थांबली. या अंड्यांपासून कुत्री आणि कोल्हे यांना दूर ठेवलं गेलं. कासवांच्या घरट्यांभोवती जाळं टाकून त्यांच्या अंड्यांना संरक्षण दिलं गेलं. यामुळं कासवांची पैदास पुन्हा सुरू झाली आणि कासवं येण्याची संख्या वाढत गेली.

या उपक्रमाला पैशांची गरज तर होतीच. मग तो पैसा कुठून उभा करायचा, हा प्रश्न होताच. तो सोडवण्यासाठी आपल्या गावातल्या या विलक्षण गोष्टीचा पर्यटनातून प्रसार करायचा आणि त्यातून हा उपक्रम पुढं चालवायचा असं ग्रामस्थांनी ठरवलं; परंतु कोकणातल्या इतर गावांप्रमाणं अनियंत्रित पर्यटनातून पर्यटकांची गर्दी आणि कचरा समस्या आपल्या गावात ओढून घेणं हे वेळासला घातक होतं. मग 'सह्याद्री निसर्ग मित्र' आणि गावकरी यांनी मिळून वेळाससाठी एक पर्यटनाचं मॉडेल (प्रारूप) बनवलं. पर्यटनातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न न करता कासव संवर्धन करणं आणि आपल्या गावाची वैशिष्ट्यपूर्ण जीवनशैली जोपासणं या गोष्टींना वेळासच्या



ग्रामस्थांनी प्राधान्य दिलं. हे करणं अजिबात सोपं नव्हतं. पर्यटकांची राहण्या खाण्याची सोय करायची म्हणजे खर्च आलाच. मग असा खर्च करणाऱ्या कुटुंबांना जास्तीत जास्त उत्पन्न मिळावं असं वाटणं साहजिक होतं; पण गावकऱ्यांनी हा मार्ग नाकारला आणि एकत्र येऊन काही कठोर निर्णय घेतले. यांतले काही वैशिष्ट्यपूर्ण निर्णय पुढीलप्रमाणे

### अ) रिसॉर्ट पद्धत नाकारून घरातून न्याहारी–निवास योजना

पर्यटनातून अधिकाअधिक उत्पन्न मिळवण्यासाठी स्वतंत्र रिसॉर्ट बांधता येतील अशा अनेक मोठ्या वाड्या वेळासमध्ये आहेत. मात्र, वेळासच्या ग्रामस्थांनी पर्यटकांच्या निवासाची सोय आपल्या घरातच करायचं ठरवलं. यामुळं पर्यटकांना खेड्यातल्या जीवनाचा आणि खाद्य संस्कृतीचा अनुभव घेता येतो. आपल्या यजमानांकडून कासवांची माहिती घेता येते आणि संवर्धनाचं महत्त्वपण कळतं. पर्यटकांची आणि यजमानांची अशी जवळीक रिसॉर्ट पद्धतीतून साधता येतेच असं नाही. रिसॉर्टकडे आकर्षित होणारे पर्यटक मुख्यतः विरंगुळा आणि मनोरंजन यांसाठी येतात. त्यांना चैनीच्या वस्तू आणि विविध प्रकारचं खाणं पिणं हवं असतं. त्याचबरोबर रिसॉर्ट बांधण्याचा मोठा खर्च केला असल्यानं गावातल्या लोकांमध्ये पर्यटक मिळवण्याची स्पर्धा सुरू होते. मग पर्यटकांना खूश ठेवण्यासाठी खर्च वाढत जातो आणि निसर्ग–संवर्धनाचं ध्येय मागं पडतं. वेळासमध्ये काही थोड्याच घरांमध्ये पर्यटकांसाठी वेगळ्या खोल्या बांधलेल्या आहेत. बहुतांश घरांत पर्यटकांना घरातली एक खोली दिली जाते. जेवण पारंपरिक पद्धतीचं असतं आणि घरात मद्यपानाला परवानगी नसते. गावातल्या सर्व निवासस्थानी पर्यटकांना एकच दर आहे. यातही स्पर्धा नाही. त्यामुळं पर्यटकांसाठी एसी किंवा स्वतंत्र टीव्ही अशा चैनीच्या सोयी देऊन आकर्षित करण्याचं प्रयोजन नाही. साहजिकच अशा पर्यटनातून पर्यटकांचा खऱ्या अर्थानं पाहुणचार होतो आणि त्यांचं ग्रामस्थांशी एक प्रकारचं नातं जुळतं.

### आ) मनोरंजनाचं पर्यटन नाकारून संवर्धनाचं पर्यटन

कासवं सातत्यानं येत राहावेत यासाठी वेळासच्या किनारपट्टीवर संयमित पर्यटन केलं जातं. इथं बीच गेम्सना, बोटिंगला आणि खाण्या–पिण्याच्या स्टॉल्सना परवानगी नाही. तसं पाहिलं, तर यातच जास्त उत्पन्न आहे; पण संवर्धनकार्याला प्राधान्य देऊन गावकऱ्यांनी या उत्पन्नाचा त्याग केला आहे. त्याचबरोबर गावात मद्यपानाचं एकही दुकान किंवा हॉटेल नाही. इतकंच नव्हे, तर गावात प्लॅस्टिक पिशव्या दिल्या जात नाहीत आणि बाटलीबंद पाण्याचा वापर कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. प्लॅस्टिक कचऱ्यासाठी पेट्या आहेत आणि ग्रामस्थ आपल्या पाहुण्यांशी यावर संवाद साधतात. तसंच गावाच्या संवर्धनकार्यात थोडाफार हातभार लावायला पर्यटकांना इथं संधी मिळते. संपूर्ण पर्यटन कासवांभोवती आखलं आहे. या गावानं अशा प्रकारच्या पर्यटनाला 'कासव महोत्सव' असं नाव दिलं आहे. जे पर्यटक निसर्गात रमू शकतात, असेच पर्यटक कालांतरानं इथं यायला लागले. त्यामुळं इतर गावांप्रमाणं इथं गर्दीगोंगाट आणि कचरा होत नाही.

### इ) पर्यटनात सर्व ग्रामस्थांचा सहभाग

२००६ साली फक्त सहा घरं या उपक्रमात सहभागी झाली होती. आज २०१७ मध्ये एकोणचाळीस घरांमधून पर्यटकांसाठी निवास योजना सुरू आहे. यातलं प्रत्येक घर आपल्या उत्पन्नातला दहा टक्के भाग कासव संवर्धनासाठी देत आहे. लहान घरं किंवा मोठं कुटुंब असणाऱ्या कुटुंबांतल्या महिलांची एक समिती आहे. या समितीमार्फत कोकणातले वैशिष्ट्यपूर्ण घरगुती पदार्थ बनवले जातात आणि हे







पदार्थ सर्व एकोणचाळीस घरांत आणि दुकानांत विक्रीला ठेवले जातात. 'कासव महोत्सवा'त संपूर्ण गाव सहभागी होतो. काही ग्रामस्थ किनारपट्टीवर गस्त घालण्याचं काम करतात. त्यांना त्याचे पैसे दिले जातात. गावातल्या काही तरुण मंडळीना 'पर्यटकांसाठी निसर्गफेरी' घेण्याचं प्रशिक्षण दिलं आहे. या फेरीतून पर्यटकांना वेळासच्या जैवविविधतेची ओळख घडून येते आणि त्यातून तरुणांना थोडं उत्पन्न मिळतं.

**ई) व्यावसायिक पद्धतीचं व्यवस्थापन**

वेळासला येणाऱ्या पर्यटकांना साध्या, पण व्यावसायिक (प्रोफेशनल) दर्जाच्या सेवा पुरवल्या जातात. यासाठी निवासी घरातल्या कुटुंबांना पाहुण्यांच्या सरबराईचं प्रशिक्षण, स्वच्छतेचे धडे आणि इंग्रजी संभाषणाची ओळख करून दिली जाते. गावानं एकत्र येऊन पर्यटनाची नियमावली बनवली आहे, जी सर्वांना बंधनकारक आहे. गावाचं स्वतंत्र संकेतस्थळ आहे, ज्यावर 'कासव महोत्सवा'ची माहिती दिलेली आहे. या संकेतस्थळावरून न्याहारी आणि निवास यांची सोय करणाऱ्या घरांशी थेट संपर्क साधता येतो. मध्यस्थ नसल्यानं किमती रास्त ठेवल्या जातात. सर्व पर्यटकांना आपल्या भेटीचा अभिप्राय लिहायची विनंती केली जाते. यातून निवासस्थानांत सुधारणा करता येतात आणि भविष्यकाळात येणाऱ्या पर्यटकांचा अनुभव अधिक सुखकर केला जातो.

वेळास ग्रामस्थांना कासव पर्यटनाचा फायदा तर झालाच; शिवाय मुख्य म्हणजे कासव संवर्धनाला एक शाश्वत मॉडेल मिळालं. आज कोकणातलं जवळजवळ प्रत्येक गाव पर्यटनातून उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळं लहान गावात स्पर्धात्मक वातावरण वाढलं आहे आणि सहकार्याच्या पूर्वापार प्रथा नाहीशा होत चालल्या आहेत. गावाचा विजेचा आणि पाण्याचा वापर तर वाढत आहेच, शिवाय कचरा आणि सांडपाणी यांच्या व्यवस्थापनाची मोठी समस्या प्रत्येक गावापुढं उभी आहे. 'वेळास'नं वैयक्तिक फायद्यापेक्षा एकत्रित ठरवलेल्या ध्येयाला प्राधान्य दिलं आणि उत्तम रीतीनं त्याची अंमलबजावणी केली. या दोन्ही गोष्टी वाखाणण्याजोग्या आहेत. यशस्वी वन्यजीव संवर्धनाचा भारतातला हा कदाचित पहिलाच उपक्रम असेल.

संपूर्ण गाव कासव संवर्धन करण्याच्या ध्येयामागं इतक्या खंबीरपणानं उभं असलेलं पाहून अनेक संस्था मदतीला पुढं आल्या. त्यात 'संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम' (युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) आणि 'इंडो-जर्मन जैवविविधता कार्यक्रम' (इंडो जर्मन बायोडायव्हर्सिटी प्रोग्रॅम) यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थाही आहेत. महाराष्ट्र सरकार तर आहेच, शिवाय इतर स्वयंसेवी संस्थाही आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शहरातले विद्यार्थी आणि संशोधक श्रमदान आणि संशोधन करण्यासाठी वेळासला येत आहेत. एके काळी संपूर्णपणे दुर्लक्षित असलेल्या 'ऑलिव्ह रिडली' कासवांवर आज अभ्यास होत आहे आणि त्यांची संख्या वाढेल अशी मोठी आशा निर्माण झाली आहे. इयत्ता नववीच्या पाठ्यपुस्तकात वेळासचा धडा असल्यानं ही गोष्ट शाळांतून सर्वत्र पोहोचली आहे. आज अकरा वर्षं होऊन गेली, वेळासचे ग्रामस्थ हा उपक्रम ग्रामपंचायतीच्या आणि महाराष्ट्र सरकारच्या वन खात्याच्या मदतीनं चालवत आहेत. खऱ्या अर्थानं इको टुरिझम करणाऱ्या वेळासचं मॉडेल कोकणातल्या अनेक गावांमधून राबवणं शक्य आहे. यात आर्थिक फायदा तर आहेच, त्याचबरोबर पर्यावरणीय ऱ्हास थांबवण्याची आणि गावाचं स्वास्थ्य जपण्याची क्षमता आहे. केवळ वैयक्तिक फायदा हे एकच ध्येय ठेवलं नाही, तर किती गोष्टी प्राप्त होऊ शकतात, हे आपल्या शहरांनाही वेळास सहजपणे शिकवून जातं!

(लेखक पर्यावरणीय व्यवस्थापनाचे डॉक्टरेट आहेत.)

संपर्क : ९८२२०३४५७९